महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-५/इंडीयन स्वच्छता लिग/ २०२२/४४६९ दिनांक 27 SEP 2022

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानीत/
खाजगी विनाअनुदानित संस्था

**विषय : इंडीयन स्वच्छता लिग हा उपक्रम यशस्वीरित्या पार पाडणेबाबत.**

**संदर्भ :** १. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई यांचे पत्र क्र. १६/आस्था/ इंडीयन स्वच्छता लिग /२०२२/३०८ दि.१६/०९/२०२२

२. महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांचे पत्र क्र. राअस/७५८ २२-२३, दि. १४.०९.२०२२

**उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन पत्र वाचावे.**

उपरोक्त विषयाचे तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई यांचे संदर्भीय क्र. १ प्राप्त पत्रानुसार कळविण्यात येते की, दिनांक १७ सप्टेंबर २०२२ ते ०२ ऑक्टोंबर २०२२ हा पंधरवडा स्वच्छ अमृत महोत्सव म्हणून घोषीत केलेला असून त्याअनुषंगाने विविध कार्यक्रमांची रुपरेषा निर्धारीत केलेली आहे.

त्याअनुषंगाने या विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय, अशासकीय अनुदानीत, खाजगी विनाअनुदानित संस्थाप्रमूखांना सूचित करण्यात येते की, सदर उपक्रमांसाठी युवकांची नोंदणी वाढविण्याकरीता उपक्रमांची माहिती महाविद्यालयांतील राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांना व इतर विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभाग नोंदविण्यासाठी प्रोत्साहीत करण्यात यावे, तसेच स्वच्छता मोहिमे बाबत अवगत करुन स्वच्छता मोहिम यशस्वी करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास info.dteropune@gmail.com **या ईमेलव्दारे** तात्काळ सादर करण्यात यावा.

सोबत - संदर्भीय पत्र.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पूणे

प्रत : १. प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६,
ई-मेल–desk16@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

पत्र क्रमांक : १६/आस्था/इंडीयन स्वच्छता लिग/२०२२/ ३०६

दिनांक : 16 SEP 2022

प्रति,

१. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

२. सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई

विषय : इंडीयन स्वच्छता लिग हा उपक्रम यशस्वीरित्या पार पाडणेबाबत..

संदर्भ : महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांचे पत्र क्र. राअस/७५८/२२-२३, दि.१४.०९.२०२

उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन पत्र पहावे. त्वरित संदर्भासाठी प्रत सोबत जोडली आहे.

संदर्भाधीन पत्रान्वये, दि.१७ सप्टेंबर २०२२ ते २ ऑक्टोबर २०२२ हा पंधरवडा स्वच्छ अमृत महोत्सव म्हणून घोषित केलेला असून त्याअनुषंगाने विविध कार्यक्रमांची रुपरेषा निर्धारीत केलेली आहे. त्या अंतर्गत इंडीयन स्वच्छता लिग ही राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा आयोजित करण्यात आलेली असून या स्पर्धेत राज्यातील सुमारे १५० हून अधिक महानगरपालिका नगरपरिषदा व नगरपंचायतीनी सहभाग नोंदविला आहे. तथापी, सदर उपक्रमांसाठी सहभाग नोंदविलेल्या युवकांचे प्रमाण अत्यल्प असून युवकांची नोंदणी वाढविण्याकरीता उपक्रमांची माहिती देणेबाबत महाविद्यालयांना अवगत करुन स्वच्छता मोहिम यशस्वी करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

करीता, आपल्या अधिनस्त संस्था/ कार्यालयांना संदर्भाधीन पत्रान्वये देण्यात आलेल्या निर्देशांनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश तात्काळ देण्यात यावेत.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
22 SEP 2022
आवक क्र. 8822

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय
**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)**
मित्तल टॉवर, "ए" विंग, ३ रा मजला, फ्रि प्रेस जरनल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई-४०००२१
दुरध्वनी क्र.०२२- २२०२०४६५ ई-मेल: director.smau@gmail.com

पत्रक्र.राअस/758/ २२-२३ दिनांक:- १४.०९.२०२२

प्रति,

मा.संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
महानगरपालिका मार्ग, मुंबई -३.

**विषय: - " इंडीयन स्वच्छता लिग " हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडणेबाबत.**

**संदर्भ :- १. या संचालनालयाचे पत्र क्र. SBM-२/७१८/२२-२३ दि.१२.०९.२०२२**
**२. या उपक्रमात सहभाग नोंदविलेल्या स्पर्धकांची संख्या (दि.१४, सप्टेंबर,२०२२ दु. ०३.०० वा.पर्यंत)**

महोदय,

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० च्या धर्तीवर राज्यात स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.०राबविण्यात येत आहे. देशातील शहरामधील स्वच्छता मोहिमेला गती देण्यासाठी व शहरे कचरामुक्त करण्याच्या अनुषंगाने केंद्रीय मंत्रालयाने **दि.१७ सप्टेंबर, २०२२ ते २ ऑक्टोबर, २०२२** हा पंधरवडा **स्वच्छ अमृत महोत्सव** म्हणून घोषित केलेला असून त्याअनुषंगाने विविध कार्यक्रमांची रूपरेषा निर्धारीत केलेली आहे. याचीच सुरूवात म्हणून **"इंडीयन स्वच्छता लिग "** ही राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा आयोजित केली आहे. यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या १० शहरांना राष्ट्रीय स्तरावर सन्मानित केले जाणार आहे. या स्पर्धेकरता देशातील १८०० पेक्षा जास्त शहरांनी सहभाग नोंदविलेला आहे. याअनुषंगाने मा. सह सचिव, गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालय तथा राष्ट्रीय अभियान संचालक, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली दि.१० सप्टेंबर, २०२२ रोजी ऑनलाईन आयोजित केलेल्या बैठकीत हा उपक्रम साजरा करण्याबाबतचे नियम व त्यासंदर्भात सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**"इंडीयन स्वच्छता लिग"या स्पर्धेत राज्यातील सुमारे १५० हून अधिक** महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपचायंतीनी सहभाग नोंदविलेला आहे. यामध्ये राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाबाबत मा. सह सचिव, यांनी दिलेल्या सूचना संदर्भ क्र. १ वरील पत्रान्वये सहभागी महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपचायंतीना कळविण्यात आले आहे. या स्पर्धेत युवकांचा सहभाग, नाविन्यपूर्ण उपक्रम व उपक्रमाचा परिणाम यावरून शहरांचे मुल्यमापन केले जाणार आहे. संदर्भ क्र. २ नुसार दि. १४ सप्टेंबर, २०२२ पर्यत

राज्यातील स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांमध्ये या उपक्रमासाठी सहभाग नोंदविलेल्या युवकांचे प्रमाण अत्यंत कमी दिसून येत आहे.

सबब सहभागी युवकांची नोंदणी वाढविण्याकरिता दोनच दिवस शिल्लक असून युवकांचा सहभाग वाढविण्याकरता मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करणे गरजेचे आहे. आपल्या अधिनस्त महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांना व इतर विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभाग नोंदविण्यासाठी प्रोत्साहीत करणे या उपक्रमांची माहिती देणेबाबत सर्व महाविद्यालया अवगत करावे, जेणे करुन या स्पर्धेत युवकांचा सहभाग वाढेल व राज्यातील स्थानिक नागरी स्वराज्य संस्थामधील स्वच्छता मोहिमेचा उद्देश सफल होईल.

सोबत संदर्भीय पत्राची प्रत व इंडीयन स्वच्छता लिगची माहिती जोडली आहे.

(समीर उन्हाळे)
राज्य अभियान संचालक
स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.)

प्रत:

उप सचिव / कक्ष अधिकारी, नवि-३४, मंत्रालय, मुंबई.